झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा ३/झोपुआ/ ५१० /२०२५
दिनांक : १९ /०३ /२०२५

**झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश (अंतिम)**

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश**

<u>प्रस्तावना -</u>

स.नं.५१पै, ५४पै, सि.स.नं.१०१५ पै, सेक्टर क्र.२२, मिलिंदनगर पैकी फातिमानगर, श्रमिकनगर, निगडी, पिंपरी चिंचवड, पुणे अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहेत.

(१) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे हे सक्षम आहेत; आणि

(२) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.१०/०९/२०२४ रोजीची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करुन महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१, पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर १९-२५, २०२४ मध्ये पृष्ठ क्र.१९, २० व २१ वर तसेच दैनिक वृत्तपत्रात दि.१४/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.१३/०९/२०२४ रोजी डकवून प्रसिध्द करण्यात आली आहे ; आणि

(३) ज्याअर्थी, सदर पूर्वसूचनेची प्रत जागा मालक, पिपरी चिंचवड महानगरपालिका यांना देखील देण्यात आली आहे. पूर्वसूचनेद्वारे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. सदरची पूर्वसूचना प्रसिध्द करणेत येवून ३० दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे. अद्यापपर्यंत या कार्यालयाकडे जमीन मालक अथवा इतर कोणाचीही लेखी स्वरुपात हरकत/तक्रार प्राप्त झालेली नाही; आणि

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टीच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश :-

(१) सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्या संदर्भातील दि.१०/०९/२०२४ रोजीची जाहिर नोटीस (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करण्याची पूर्वसूचना) कायम करुन खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करणे शक्य आहे.

## अनुसूची क्र.१
## सध्या अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीचे क्षेत्र

**झोपडपट्टीचे नाव** :- स.नं.५१पै, ५४पै, सि.स.नं.१०१५ पै, सेक्टर क्र.२२, मिलिंदनगर पैकी फातिमानगर, श्रमिकनगर, निगडी, पिंपरी चिंचवड, जिल्हा-पुणे (Non Buildable)
**महानगरपालिका क्षेत्र** :- पिंपरी चिचवड महानगरपालिका.

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (अंदाजे) | चतु:सिमा (मोजणी नकाशानुसार) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| मिलिंदनगर पैकी फातिमानगर, श्रमिकनगर | स.नं.५१पै, ५४पै, सि.स.नं. १०१५पै, सेक्टर क्र.२२ | पिंपरी चिचवड नववसाहत प्राधिकरण | ३०७५.९२ चौ.मी. (यापूर्वीचे मनपा मार्फत झालेले पुनर्वसन क्षेत्र वगळून) | लागू रस्ता, स.नं.५४पै. सि.स.नं. १०१५पै. | स.नं.५१पै, सि.स.नं. १०१५पै. व लागू स.नं.५६ | स.नं.५१पै, सि.स.नं. १०१५ पै. | स.नं. ५४पै, सि.स.नं.१०१५ पै. व .नं.५१पै, सि.स.नं.१०१५पै. |

## अनुसूची क्र.२
## ज्या ठिकाणी स्थलांतरणाने पुनर्वसन करावयाचे ते क्षेत्र

झोपडपट्टीचे नाव :- MIDC प्लॉट नं. P -२५ & P-२६, पिंपरी औद्योगिक क्षेत्र, आकुर्डी, जिल्हा- पुणे.
महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी चिचवड महानगरपालिका.

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| पिंपरी औद्योगिक क्षेत्र, आकुर्डी, पुणे | MIDC प्लॉट नं. P -२५ & P-२६ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (भाडेपट्टाधारक - मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स) | १३०३०.०० चौ.मी. | २४.५० मीटर रस्ता | १८.० मी रस्ता व ६.०० मी रस्ता | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ची सरहद्द | प्लॉट नं. RL.२१० RL.२११ RL २०९ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- १९/03 /२०२५.

(नीलेश गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

प्रत-

१. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव.
२. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे-१९ -यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.
३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
४. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे- झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावा.